# मुंबई विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

Azadi Ka Amrit Mahotsav

वेबसाईट :-www.nssmu.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.**


पत्र.क्र.रासेयो/ईसीडी/२०२३-२४/१००४
दिनांक : ११.१२.२०२३

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मुंबई विद्यापीठ अधिनस्त सर्व महाविद्यालये.

**विषय : राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर आयोजनाबाबत...**
**संदर्भ :** रासेयो, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.रासेयो-२०२३/प्र.क्र.२०९ /साशि-७, दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२३ रोजीचे पत्र.

महोदय/ महोदया,

उपरोक्त संदर्भ पत्रानुसार राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विशेष शिबिरासाठी मंजूर विद्यार्थी संस्थेनुसार (नोंद विद्यार्थ्यांच्या ५०% विद्यार्थी संख्या) दरवर्षी शिबिर आयोजीत करणे अनिवार्य आहे. साधारणता वर्षातून एकदा सात दिवसांचे निवासी शिबिर महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या गाव/वस्ती मध्ये नोव्हेंबर ते जानेवारी या हिवाळी ॠतू मध्ये आयोजन करण्यात येते. राष्ट्रीय सेवा योजना स्वंयसेवकांना २ वर्षामध्ये प्रति वर्षी १२० तास म्हणजे एकूण २४० तास व दोन्ही वर्षात मिळून एक सात दिवसीय निवासी शिबिर करणे अनिवार्य आहे.

शिबिरासंबंधी काही सुचना खालीलप्रमाणे

- शिबिर सुरू होण्यापूर्वी किमान १५ दिवस आधी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्ष व जिल्हा समन्वयक यांना लेखी कळविणे आवश्यक आहे.
- राष्ट्रीय सेवा योजना नोंद विद्यार्थ्यांच्या ५०% विद्यार्थी शिबिरास उपस्थित राहणे आवश्यक आहे.
- शिबिर संपन्न झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल योग्य त्या नमुन्यामध्ये विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्षास सादर करणे आवश्यक आहे.
- शिबिर स्थळावर विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी योग्य त्या आवश्यक सुविधा उपलब्ध असाव्यात.
- शिबिरामध्ये सहभागी विद्यार्थी मुले व मुली असल्याने शिबिरात कार्यक्रम अधिकारी पुरूष व महिला यांना सातही दिवस उपस्थित राहणे बंधनकारक आहे.
- शिबिर स्थळी योग्य ती शिस्त राखली जावी व ग्रामस्थांना शिबिराचा त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी.
- शिबिर कालावधी, उपक्रम, इत्यादींची माहिती संबंधीत ग्रामपंचायत, ग्रामसेवक, पोलीस स्टेशन, सरकारी दवाखाना इत्यादींना देणे आवश्यक आहे.
- शिबिर कालावधी दरम्यान संबंधीत गाव/वस्ती यांना उपयोगी उपक्रम तसेच शासनाच्या उपयुक्त योजना/उपक्रम राबविण्यात यावेत.
- शिबिर उपक्रमात 'श्रमप्रतिष्ठा' उपक्रमासमवेत एकात्मीत ग्राम/वस्ती विकास व विद्यार्थ्यांचे नेतृत्व/कौशल्य विकास उपक्रमाचा समावेश असावा.

- ग्राम विकास योजना, स्वच्छता अभियान इत्यादी उपक्रमात गावातील/वस्तीतील युवक/युवती यांचा सहभाग घ्यावा.
- शिबिराचे सातही दिवस शिबिरार्थी कार्यक्रम अधिकारी शिबिर स्थळी उपस्थित असावेत व त्यांची स्वाक्षरी असलेली हजेरी पत्रक/नोंद वही शिबिरस्थळी उपलब्ध असावी.
- रासेयो वार्षिक विशेष शिबिर हे महाविद्यालयांच्या परिसरात आयोजित करण्यात येऊ नये, महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमासाठी दत्तक घेतलेले गाव/खेडे/वस्ती येथे विद्यार्थ्यांनी शिबिरासाठीचे उपक्रम करणे व वास्तव्यास असणे आवश्यक आहे.
- शिबिर दरम्यान अर्धवट राहिलेले प्रकल्प/उपक्रमांचा पाठपुरावा नियमित कार्यक्रम अंतर्गत घेणे शक्य आहे.
- शिबिरादरम्यान शिबिरार्थींना सकस, साधे व संतुलित आहार पुरविण्यात यावा. स्थानिक भाज्या साहित्यां इत्यादीचा वापर व्हावा व या प्रक्रियेत शिबिरार्थींना सामावून घेण्यात यावे.
- शिबिरा दरम्यान अपेय पान/व्यसन वर्ज्य आहे, तसेच ग्रामस्थांना त्रास होईल इतक्या मोठया आवाजात गाणी/वाजवणे देखील नसावे.
- शिबिरापूर्वी महाविद्यालय स्तरावर शिबिर दैनंदिन उपक्रमाचे योग्य नियोजन करावे.
- शिबिर स्थळ व उपक्रमांविषयी, सहभागी विद्यार्थी व यांचे पालक यांना अवगत करावे. तसेच सर्वसहभागी शिबिरार्थींच्या पालकांचे संमती पत्र घावे.
- शिबिरा दरम्यान काही अनाहूत घटना घडल्यास त्वरीत महाविद्यालयाचे प्राचार्य यांना अवगत करणे व त्याचे सहमतीने योग्य तो निर्णय घ्यावा.
- महाविद्यालयीने विद्यापीठास लेखी न कळविता आयोजित शिबिर किंवा सात दिवसापेक्षा कमी कालावधीचे शिबिरे किंवा अनिवासी शिबिर विद्यापीठ रासेयो विभागाकडून नामंजूर करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.
- शिबिर आयोजनासाठी रासेयो संहितेचा (NSS Manual) वापर करण्यात यावा.
- मुला मुलींची राहण्याची व्यवस्था स्वतंत्र असावी.
- पहिल्या दिवशी दुपारच्या जेवणापूर्वी सर्व शिबिरार्थी शिबिर स्थळी उपस्थित असावेत तसेच शेवटच्या दिवशी जेवणानंतर शिबिर समारोप करण्यात यावा.
- प्रथमोपचार पेटी स्थानिक PHC / वैद्यकिय अधिकारी यांचे संपर्क क्रमांक शिबिरस्थळी असावेत.
- अंघोळीसाठी मुलांना नदी/विहिरीत उतरण्यास मनाई करण्यात यावी.

सुशील शिंदे
विशेष कार्य अधिकारी, (रा.से.यो.)

sd
सुधीर पुराणिक
संचालक, रा.से.यो., मुंबई विद्यापीठ